उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे

दूरध्वनी क्रमांक ०२०२६०५२३०० ईमेल-ddhspunecircle@gmail.com.

पाहिजेत

उपसंचालक,आरोगय सेवा पुणे मंडळ,पुणे अंतर्गत जिल्हा व क्षेत्रीय क्षेत्रामध्ये प्रलंबित असलेल्या विविध न्यायालयीन भागांमध्ये पुणे मंडळातील जिल्ह्याची विविध क्षेत्रीय न्यायालये मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयांमध्ये कायदे विभागीय बाबी विशेषज्ञ न्यायालयीन प्रकरणे, सल्ला व न्यायालयीन प्रकरणे अधिकारी अधिकारी पुणे मंडळामध्ये उमेदवारी विधींची नियुक्ती करीता या कार्यालयामार्फत दैनिक जनसागर या वृत्तपत्रात ऑनलाईन व्दारे जाहिरात तसेच वेबसाईटवर दि.२०.०२.२०२३ रोजी प्रसिध्द करून दिनांक २२.०२.२०२३ अखेर पर्यत अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि वरिल प्रमाणे प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अल्प प्रतिसाद मिळाला असल्याने स्पर्धात्मक निवडी करीता ॲडव्होकेट पॅनलवर विधी तज्ञांच्या नियुक्त्यांवरील अटी व शर्तीबाबत सविस्तर व विहीत अर्जाचा नमुना जाहिरात www.arogya.maharashtra.gov.in या वेबसाईटवर दुबार जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दि. ०७.०३.२०२३ तारखेअखेर ५.४५ वाजेपर्यंत उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे यांच्या कार्यालयात नोंदणीकृत टपालाव्दारे अथवा ddhspunecircle@gmail.com या ईमेलवर प्राप्त होतील अशा बेताने अर्ज पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला नाही.

(डॉ राधाकिशन पवार)<br>
उपसंचालक,आरोग्य सेवा,<br>
पुणे मंडळ,पुणे

ठिकाण -पुणे<br>
दिनांक-२७.०२.२०२३

दुबार जाहिरात

उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे

उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे अंतर्गत जिल्हा व तालुका स्तरावरील प्रलंबीत असलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे बाजू विविध स्तरावरील न्यायालयामध्ये प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयातील सर्व प्रकरणांच्या कायदे विषयक बाबी बाबत/न्यायालयीन प्रकरणे, सल्ला देणे व न्यायालयीन कामकाजाकरीता ॲडव्होकेट पॅनेल वर खाली नमूद न्यायालयात विधी तज्ञांची नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी ॲडव्होकेट पॅनलवर खालील प्रमाणे वकील नियुक्तीसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालय | नियुक्ती करावयाच्या वकीलाची संख्या | अर्जदारासाठी आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|
| १ | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | १ | मा. सर्वोच्च न्यायालयात ५ वर्ष |
| २ | मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ | प्रत्येकी १ | मा. उच्च न्यायालयात ५ वर्ष |
| ३ | मा. कॅट/ मॅट न्यायालयात १० वर्ष | १ | मा. कॅट/ मॅट कोर्ट मुंबई ५ वर्ष |
| ४ | मा. तालुका व जिल्हा न्यायालय पुणे /सोलापूर/सातारा | १ | मा. स्थानिक कोर्टात ५ वर्ष. |

अटी व शर्ती.

१) अर्जदार हा भारताचा नागरीक असावा.
२) मान्यता प्राप्त विद्यापिठाची विधी शाखेची पदवी अशावी.
(३) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदाराचे वय किमान ३३ वर्ष पूर्ण असावे.
४) अर्जदार यांनी सनद धारण केलेली असावी.
५) अर्जदाराचा वकील व्यवसायाचा वरील तक्त्याप्रमाणे अनुभव आवश्यक राहील.
६) अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.
(७) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक न्यायालय कामकाजाकरीता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि एकापेक्षा अधिक न्यायालयासाठी निवड केली जाणार नाही.
८) अर्जदारास फौजदारी गुन्हा विषयक, सेवाविषयक, प्रशासकिय, दिवाणी व महसूल विषयक अशा प्रकारच्या कायद्याची स्थिती विभागीय चौकश्या इत्यादी बाबतीत पुरेसे ज्ञान संपन्न असावा.
(९) निवड करण्यात आलेल्या उमेदवाराकडून विहीत केलेल्या नमुन्यात करारपत्र (Agreement) करून घेण्यात येईल.

अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.

१) शैक्षणीक अर्हतेसंदर्भात सर्व कागदपत्रे, विधी शाखेचे प्रमाणपत्र, बार कौन्सिलचे प्रमाणपत्र, (सदर कागदपत्रांची अर्जासोबत साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी)
२) वयाच्या पुराव्याकरीता माध्यमिक शाळा उत्तीर्ण प्रमाणपत्र अथवा इतर समकक्ष पुरावा.
३) न्यायालयामध्ये दावे चालविण्याचा विहीत अनुभव असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
४) उमेदवारांनी त्यांचे अनुभवाबाबतचे स्व-साक्षांकनाचे घोषणापत्र सादर करावे.

निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया

१) ॲडव्होकेट पॅनल निवडीसाठी गठीत केलेल्या समिती मार्फत अर्जाची संख्या विचारात घेवून उमेदवारांची निवड केली जाईल. विहीत पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडी बाबत संपूर्ण अधिकार निवड समितीस राहील.

२) ॲडव्होकेट पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/ तहकूब करणे/ रदद करणेचे अधिकार उपसचांलक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे यांचेकडे राखीव राहतील.

वकील फीचे दर व त्याबाबतचे निकष.

ॲडव्होकेट पॅनेल वरील निवड केलेल्या वकीलांना खालील प्रमाणे वकील फी अनुज्ञेय राहील.

वकील फीचे दर व त्याबाबतचे निकष खालील प्रमाणे असतील.

| अ.क्र | कामकाजाची बाब | वकील फी (प्रती दावा) | इतर खर्च (प्रती | एकूण (प्रती दावा) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | ६५०००/- | १५०००/- | ८००००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के दावा दाखल केल्यावर |
| २ | मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ | २००००/- | ५०००/- | २५०००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के |
| ३ | मा. कॅट/ मॅट कोर्ट मुंबई | २००००/- | ५०००/- | २५०००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के |
| ४ | तालुकास्तर दिवाणी न्यायालय | १३०००/ | २०००/ | १५०००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के |
| ५ | प्रत्येक तालुक्यासाठी तेथील स्थानिक वकील | १३०००/- | २०००/- | १५०००/- | दावा दाखल केल्यावर ५०- टक्के निकालानंतर ५० दावा दाखल केल्यावर |
| ६ | कायदेविषयक अभिप्राय देणे. | ३०००/- | - | ३०००/- | कार्यवाहीनंतर आदा करणे |
| ७ | कायदेशीर नोटीस देणे अथवा उत्तर देणे | ५०००/- | ५००/- | ५५००/- | कार्यवाहीनंतर आदा करणे |
| ८ | स्थानिक न्यायालयात कॅव्हिएट दाखल करणे | ३०००/- | - | ३०००/- | प्रति कॅव्हिएट सहकार्यवाहीनंतर आदा करणे. |
| ९ | रिट याचिकेचे पॅरावाईज उत्तर तयार करणे. | ५०००/- | - | ५०००/- | कार्यवाहीनंतर करणे |

सदर बाबत इतर अनुषंगिक बाबी पुढील प्रमाणे राहतील.

१) ज्या दाव्यामध्ये पुणे मंडळ,पुणे,वादी असेल त्या दाव्यामध्ये वरील प्रमाणे पर अनुज्ञेय राहील.

२) ज्या दाव्यामध्ये पुणे मंडळ,पुणे प्रतिवादी असेल अशा दाव्यामध्ये वरील मानधनामध्ये २० टक्के कमी करणेत येईल.

३) वकील फी व खर्चाच्या रकमा वरील तक्त्यात संबंधीत बाबीसमोर नमूद केल्याप्रमाणे आदा करण्यात येतील. वकील पत्र दाखल करुन लेखी म्हणणे (शपथपत्र) दाखल केल्यानंतर प्रथम ५० टक्के अंतिम निकालानंतर ५० टक्के रक्कम आदा करण्यात येईल. तसेच दावा दाखल झालेल्या सुरुवातीच्या काळात पक्षकाराने दावा काढून घेतल्यास ५० टक्केच रक्कम आदा करण्यात येईल. परंतु दाव्याच्या शेवटच्या स्टेज पर्यंत दावा काढून घेतल्यास पूर्ण रक्कम आदा करण्यात येईल. दावा निकाली झाल्यानंतर दाव्याची प्रमाणित प्रत (सर्टीफाईड कॉपी) देण्याची जबाबदारी पॅनेलवरील वकीलांची राहील.

४) उपरोक्त नमूद अनुज्ञेय खर्चामध्ये कोर्टात सादर करावयाचे लेखी म्हणणे, जादा म्हणणे, दावा दुरुस्ती व वकीलांनी कोर्टात सादर करावयाचे अर्जाचे टायपिंग, निकालाची प्रत मागून घेणे याचा समावेश इतर खर्चामध्ये आहे.पुणे मंडळ,पुणे.च्या वतीने रिट याचिका दावा किंवा अपील दाखल करताना कोर्ट फी भरावी लागत असल्यास ती अतिरिक्त देय राहील.

५) सुपूर्द केलेल्या प्रकरणानुसार काही वेळा वकीलांना कार्यक्षेत्राबाहेरील कोर्टात उपस्थित राहून काम पहावे लागते अशा प्रकरणी प्रवास भत्ता, दैनिक भत्ता वकील फी व्यतिरिक्त देय राहील. सदर भत्ता उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना देय असलेल्या दराने अदा करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी त्यांना नियुक्त केलेल्या कार्यक्षेत्राबाहेर न्यायालयात उपस्थित राहणेबाबत संबंधीत खाते प्रमुखांची पूर्व संमती घेणे आवश्यक राहील.

६) पुणे मंडळ,पुणे.च्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील दाव्यामध्ये तसेच वर नमूद फी मध्ये प्रकरण परत्वे वाढ करणेचे अधिकार उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे यांना राहतील, पॅनेलमधील विशीष्ठ वकील अथवा पॅनेलव्यतिरिक्त विधीज्ञांची (वकीलांची) नियुक्ती करण्याचा व त्याची फी ठरविण्याचा अधिकार उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे राहील.

७) कोणत्या वकीलास कोणते व किती दावे द्यायचे याचा अधिकार उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे यांना या संदर्भात सर्व वकीलांना समसमान पध्दतीने अथवा विशीष्ठ विभागांचे दावे विशीष्ठ वकीलांकडे देणे अथवा विशीष्ठ स्वरुपाचे दावे विशीष्ठ वकीलांकडे देणे यापैकी यथोचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्त वकीलांचे कर्तव्ये व जबाबदा-या

१) उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व संपूर्ण न्यायालयीन प्रकरणे हाताळणे,

२) उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे हिताचे संवर्धन होईल या दृष्टीने प्रशासकिय बाबीचे माहिती घेवून त्यास आवश्यक तो कायदयाचा आधार देवून उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे बाजू पूर्ण प्रभावाने न्यायालयात मांडणे.

३) सेवा विषयक / प्रशासकिय बाबी/विभागीय चौकशी तथा 'समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

४) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिका-याचे मदतीने तयार करणे.

५) उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे या कार्यालयाच्या हिताच्या दृष्टीने प्रकरणाबाबतचा आवश्यक ती गोपनीयता बाळगणे .

६) पॅनेलवर नियुक्त वकीलाना उपसंचालक,आरोगय सेवा पुणे मंडळ,पुणे वादी /प्रतिवादी असलेल्या प्रकरणी म्हणजेच उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे यांच्या विरोधात वकील पत्र घेता येणार नाही.

७) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दालख करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.

८) पॅनेलवरील एखादा वकील त्याचेवर सोपवलेली जबाबदारी पुरेशा प्रभाविपणे मांडत नसल्याची बाब निर्देशनास आल्यास त्यांचे सदर प्रकरणातील वकील पत्र रदद करण्यात येईल अथवा त्यांची पॅनेलवरील नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

९) पॅनेलवर नियुक्ती वकीलांना केस विषय केस संबधी विषयीच्या कामकाजातील नैपुण्य इ बाबीचा विचार करुन केसेस सुपुर्द केल्या जातील

१०) उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे स्तरावर बोलाविण्यात येणा-या वकीलाच्या सभांना उपस्थित राहून त्याच्या कडील सोपविलेल्या प्रकरणाच्या सदयास्थिती विषयी माहितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहिल.

११) उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे किंवा संबधित विभागाचे खाते प्रमुख यांनी एखादया दाव्या संदर्भात चर्चा करणे कामी उपस्थित राहणेबाबत सूचित केल्यास पॅनलवरील वकीलाना दिलेल्या वेळीत उपस्थित राहणे बंधनकारक राहिल.

१२) न्यायालयीन प्रकरणासंदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सात दिवसाच्या आत प्रत्येक सुनावणीनंतर मा उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे यांना सादर करणे बंधनकारक राहिल.

अर्जदारांना सर्वसाधारण सुचना :-

१. अर्जाचा नमुना www.arogya.maharashtra.gov.in / या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२. विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाप यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात ॲडव्होकेट पॅनेल करीता नियुक्ती असे नमूद करुन त्यावर पुढील प्रमाणे पत्ता नमूद करावा उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे ,नविन प्रशासकीय इमारत ३ रा मजला विधान भवन समोर,पुणे ४११००१ या पत्थावर पोहोचतील अशा बेताने आर.पी.ए.डी. व्दारे समक्ष, कुरिअर व्दारे अथवा ddhspunecircle@gmail.com या इमेल वर दि. ०७.०३.२०२३ पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ईमेलव्दारे सादर केल्या जाणाऱ्या अर्जाचे बाबतीत विषयात उपंसचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे ॲडव्होकेट पॅनेल करीता नियुक्ती असे स्पष्ट नमूद करावे. विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. सदर अर्जात अर्जदार यांनी त्यांचे संपूर्ण नाव, टपालाचा पूर्ण पत्ता पिनकोडसह भ्रमणध्वनी/ दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी. शैक्षणीक अर्हता, अनुभव इत्यादी विषयक माहिती साक्षांकित प्रतीसह अर्जासोबत सादर करावी.

(डॉ राधाकिशन पवार)
उपसंचालक,आरोग्य सेवा,
पुणे मंडळ,पुणे

ठिकण -पुणे
दिनांक -२७.०२.२०२३

उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे अंतर्गत न्यायालय वकील पॅनेल करीता नियुक्ती साठी अर्ज

प्रति,
मा उपसंचालक,
आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे

विषय :- उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ,पुणे ॲडव्होकेट पॅनेलवरील नियुक्ती

अ) अर्जदार यांची वैयक्तीक माहिती (योग्य असले त्या ठिकाणी () खून करावी.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव | मराठीत /इंग्रजीत |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३ | कायमचा पत्ता | |
| ४ | दूरध्वनी क्र /मोबईल क्रमांक | |
| ५ | आधार क्रमांक | |
| ६ | पॅन क्रमांक | |
| ७ | ईमेल आयडी | |
| ८ | राष्ट्रीयत्व | |
| ९ | जन्म दिनांक | |

ब) अर्जदार शैक्षणीक माहिती

| शिक्षण | शैक्षणीक संस्थेचेनांव विद्यालय /महाविद्यालय | बोर्ड /विद्यापीठ | उत्तीर्णझाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

इतर अर्हता

| | | |
|---|---|---|
| 1) | संगणक परिक्षा उत्तीर्ण आहे काय | |
| २ | भाषेचे ज्ञान<br>१.मराठी<br>२.हिंदी<br>३.इंग्रजी | मौखिक लेखी<br>मौखिक लेखी<br>मौखिक लेखी |

व्यावसायीक पात्रता

<table>
<tr><td>१)</td><td>सनद घेतल्याचा दिनांक</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२)</td><td>पुढील पैकी कोणत्या न्यायालयीन प्रकरणामध्ये काम करणेस इच्छुक आहे</td><td colspan="3">आस्थापना<br>दिवाणी<br>फौजदारी<br>औदयोगीक</td></tr>
<tr><td>३)</td><td>अन्य जिल्हा वकील पॅनलेवर काम केले असल्यास त्याचा तपशील</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">वकील व्यवसायाचा अनुभवाचा तपशील</td><td>अ.क्र.</td><td>न्यायालयाचें नांव</td><td>केसेसचा प्रकार</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
</table>